# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

२० ऑक्टोंबर, २०१७



☎ : 07172-264300
📠: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


❖ **पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहीमेतंर्गत अवैध दारुविक्रीच्या जिल्हयात एकुण १६ केसेस :-**

महाराष्ट्र शासनाचे आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्याात दिनांक ०१/०४/२०१५ पासुन दारूबंदी घोषीत करण्यात आलेली असुन पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवुन **दिनांक १९/१०/२०१७ चे ००:०१ ते २३:५९ वाजता पर्यंत जिल्ह्याात पोलीस स्टेशन रामनगर, दुर्गापुर, घुग्घुस, भिसी, नागभीड, मुल, पाथरी, सिंदेवाही, सावली, पोंभुर्णा, गोंडपिपरी, कोठारी,** हदद्दीत **एकुण १,२०,८००/-रू.** ची अवैध दारु जप्त करण्यात आली आहे. पोलीस स्टेशन ला एकुण **१६** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **७** आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

❖ **मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्या मद्यपी वाहन चालकांवर कार्यवाही :-**

**पोलीस स्टेशन सावली :-**

दिनांक १९/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **सावली** अंतर्गत ०२ आरोपी इसम हे आपआपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारुचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **सावली** येथे अप.क्र. ६३१/२०१७ व ६३२/२०१७ कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील ०२ आरोपीस अटक करण्यात आले असून पुढील तपास **सावली** पोलीस करीत आहे.

**पोलीस स्टेशन माजरी:-**

दिनांक १९/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **माजरी** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारुचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **माजरी** येथे अप.क्र. ३४३/२०१७ कलम २७९ भादंवि सहकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास **माजरी** पोलीस करीत आहे.

❖ **मुंबई जुगार कायदा अन्वये कार्यवाही :-**

**पोलीस स्टेशन बल्लारशाह :-**

दिनांक १९/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **बल्लारशाह** अंतर्गत ०३ आरोपी इसम हे सार्वजनिक ठिकाणी सट्टापट्टीचे आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **बल्लारशाह** येथे अप.क्र. १०१८/२०१७ कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. सदर ०३ आरोपींना अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून सट्टापट्टीचे साहीत्यासह नगदी असा एकुण **६५०**/-रु चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **बल्लारशाह** पोलीस करीत आहे.

❖ **प्रतिबंधक कारवाई :-**

दिनांक १९/१०/२०१७ रोजी जिल्ह्याात, कलम १०७ दंड प्रक्रिया संहिता अन्वये ०९, कलम ११० दंड प्रक्रिया संहिता अन्वये ०१, कलम **११०/११७** मुंबई पोलीस कायदा अन्वये ०२, कलम **९३** मुंबई पोलीस कायदा अन्वये **०१** असे एकुण **१३** ईसमांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

❖ **मोटार वाहन कायदा अन्वये कारवाई :-**

दिनांक १९/१०/२०१७ रोजी जिल्ह्याात मोटार वाहन कायदा अन्वये अवैध प्रवाशी ०१, रिफ्लेक्टर/नोपार्किंग ०२, दारु प्राशन १८५ अन्वये ०८ इतर केसेस **१६४** असे एकुण **१७५** केसेस करण्यात आल्या आहेत.